# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या योजनांची माहिती

**प्रस्तावना :**

मराठी साहित्य संस्कृती व कला या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्रास लाभलेला थोर वारसा जतन व संवर्धन करण्यासाठी आणि विविध विषयांवरील मूलभूत संशोधन व प्रकाशन यांना उत्तेजन देण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने १९ नोव्हेंबर, १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. अशा तऱ्हेच्या मंडळाची मूळ संकल्पना महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व.यशवंतरावजी चव्हाण यांची होती. संपूर्ण भारतात राज्य पातळीवर स्थापन करण्यात आलेले साहित्य-संस्कृतीविषयक कार्य करणारे हे पहिलेच मंडळ होय. मंडळाचे पहिले अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे होते.

१) **मंडळाचे मुख्य उद्दिष्ट -**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे मुख्य उद्दिष्ट 'पुस्तक प्रकाशन' हे आहे. या मुख्य उद्दिष्टानुसारच सदर योजनेअंतर्गत साहित्य, संस्कृती, कला, इतिहास यासारख्या विषयांवर वैचारिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक, वाङ्मयीन संशोधन या प्रकारचे वैविध्यपूर्ण, नाविन्यपूर्ण मौलिक स्वरूपाचे ग्रंथ मंडळाकडून प्रकाशित केले जातात. खाजगी प्रकाशकांकडून जे गंभीर, वैचारिक, उच्च दर्जाचे बौद्धिक, वाङ्मयीन संशोधनात्मक ग्रंथ प्रकाशित केले जात नाहीत, असे अत्यंत महत्त्वाचे गंभीर वाङ्मयीन संशोधनात्मक ग्रंथ मंडळाकडून प्रकाशित केले जातात. मंडळाच्या साहित्य संवर्धनाच्या उद्दिष्टपूर्ततेसाठी मंडळामार्फत खालील योजना राबविल्या जातात.

**२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या प्रमुख योजना -**

१) पुस्तक प्रकाशन योजना
२) ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना
३) नवलेखक उत्तेजनार्थ अनुदान योजना
४) नवलेखकांची चर्चासत्रे/ कार्यशाळांना अनुदान योजना
५) सात साहित्य संस्थांना अनुदान
६) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास अनुदान
७) नियतकालिकांना अनुदान
८)स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार, श्री.पु. भागवत पुरस्कार
९) जिल्हा साहित्य संमेलनांना अनुदान
१०) बृहद्ग्रंथ प्रकल्प योजना

**३) मंडळाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती -**

१) **पुस्तक प्रकाशन योजना —**

मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. सासंमं २०१३/प्र.क्र.१८०/२०१३, भाषा-३, दि.१५/१२/२०१४ या शासन निर्णयान्वये सदर योजना मंडळाच्यावतीने राबविण्यात येते. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे 'पुस्तक प्रकाशन' हे मुख्य उद्दिष्ट आहे. सदर योजनेमध्ये साहित्य, संस्कृती, कला, इतिहास यासारख्या विषयांवर वैचारिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक, वाङ्मयीन संशोधन या विषयांवरील वैविध्यपूर्ण, महत्त्वपूर्ण, नाविन्यपूर्ण व दुर्मिळ स्वरूपाचे ग्रंथ मंडळाकडून प्रकाशित केले जातात. खाजगी प्रकाशकांकडून जे गंभीर, वैचारिक, उच्च दर्जाचे बौद्धिक, वाङ्मयीन संशोधनात्मक ग्रंथ प्रकाशित केले जात नाहीत, असे अत्यंत महत्त्वाचे गंभीर वाङ्मयीन संशोधनात्मक ग्रंथ मंडळाकडून प्रकाशित केले जातात. तसेच मंडळाने प्रकाशित केलेल्या पुस्तकांचे मागणीनुसार पुनर्मुद्रणही केले जाते. मंडळाने प्रकाशित केलेली पुस्तके ई-बुक/पीडीएफ स्वरुपात मंडळाच्या https://sahitya.marathi.gov.in या संकेतस्थळावर मोफत स्वरुपात वाचकांना उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

**२) ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान -**

मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. सासंमं २०१३/प्र.क्र.१८०/२०१३, भाषा-३,दि. १/१०/२०१४ या शासन निर्णयान्वये सदर योजना मंडळाच्यावतीने राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत मराठीतील वैचारिक विषयावरील वैशिष्ट्यपूर्ण संशोधनात्मक अशा उच्च दर्जाच्या लेखनाचा, तसेच ललित साहित्यातील वाङ्मयीन दृष्टीने गुणवत्तापूर्ण असलेल्या लेखनाचा विचार अनुदानासाठी केला जातो.

**३) नवलेखक उत्तेजनार्थ अनुदान योजना —**

मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. सासंमं १०१३/प्र.क्र.१६५/२०१३/भाषा-३, दिनांक ७/१२/२०१३ या शासन निर्णयान्वये सदर योजना मंडळाच्यावतीने राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत ज्यांचे एकही पुस्तक प्रकाशित झालेले नाही, अशा नवलेखकांना कथा, कादंबरी, ललितगद्य, काव्य, नाटक (एकांकिका), बालवाङ्मय या लेखनाच्या प्रकाशनासाठी मंडळाकडून अनुदान दिले जाते.

**४) नवलेखकांची चर्चासत्रे / कार्यशाळांना अनुदान योजना** -

मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक नलेका - २०१९/प्र.क्र. ५७/भाषा-३, दिनांक ०५ ऑगस्ट, २०१९ या शासन निर्णयान्वये सदर योजना मंडळाच्यावतीने राबविण्यात येते. नवलेखकांना ज्येष्ठ साहित्यिकांचे मार्गदर्शन व्हावे, त्यांच्या लेखनात सुधारणा व्हावी, म्हणून महाराष्ट्रात विविध ठिकाणी नवलेखकांची १० चर्चासत्रे/कार्यशाळा आयोजित केल्या जातात.

**५) साहित्य संस्थांना अनुदान** —

मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. सापअ - १०१५/प्र.क्र. १४७/२०१५/भाषा - ३, दिनांक ०८ नोव्हेंबर, २०१७ या शासन निर्णयान्वये सदर योजना मंडळाच्यावतीने राबविण्यात येते. या अनुदान योजनेंतर्गत शासनामार्फत १९८९-९० सालापासून मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या विकासासाठी - १) अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, २) विदर्भ साहित्य संघ, नागपूर, ३) मराठवाडा साहित्य परिषद, छत्रपती संभाजीनगर, ४) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे ५) मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई ६) कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी ७) दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर अशा ७ संस्थांना दरवर्षी प्रत्येकी रक्कम ५.०० लाख रुपये अनुदान देण्यात येत होते. सन २०१८-१९ या वित्तीय वर्षापासून सदर साहित्य संस्थांना अनुदान प्रत्येकी रु.१०.०० लक्ष करण्यात आले आहे.

**६) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास अनुदान** —

मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. अभासं-२०२३/प्र.क्र.३/भाषा-३, दि.२२/१२/२०२३ या शासन निर्णयान्वये सदर योजना मंडळाच्यावतीने राबविण्यात येते.अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाकडून दरवर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित केले जाते. या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी रु.५०.०० लक्ष इतके अनुदान मंडळामार्फत दिले जात होते. सन २०२३-२४ या वित्तीय वर्षापासून सदर अनुदान रु. ०२.०० कोटी इतके करण्यात आले आहे.

**७) नियतकालिकांना अनुदान -**

मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक सासंमं-१०१३/प्र.क्र.१६६/२०१३/भाषा-३, दिनांक १५/०१/२०१४ या शासन निर्णयान्वये सदर योजना मंडळाच्यावतीने राबविण्यात येते. सदर योजनंतर्गत मराठी भाषेत विविध विषयांवर प्रसिध्द होणाऱ्या ५५ नियतकालिकांना प्रतिवर्षी अनुदान वितरित केले जाते.

**८) स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार व श्री. पु. भागवत पुरस्कार योजना** —

मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. रावापु-१०१२/प्र.क्र.१०४/२०१२/भाषा-३, दि.१०/०९/२०१२, या शासन निर्णयान्वये सदर योजना मंडळाच्यावतीने राबविण्यात येते. सन २०१२ पासून राज्य वाङ्मय पुरस्कार योजना सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून मंडळाकडे हस्तांतरित करण्यात आली. सदर योजना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्यावतीने 'स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना' या नावाने राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत अ) प्रौढ वाङ्मय विभागात २२ वाङ्मय पुरस्कार, ब) बालवाङ्मय विभागात ६ पुरस्कार, क) प्रथम प्रकाशन विभागात ६ पुरस्कार व ड) सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार १ असे एकूण ३५ राज्य वाङ्मय पुरस्कार मंडळाच्यावतीने प्रदान केले जातात. तसेच मंडळाकडून दरवर्षी विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार व श्री. पु. भागवत पुरस्कार प्रदान केले जातात.

**९) जिल्हा साहित्य संमेलनास अनुदान योजना -**

मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक रासांधो - २०२३/प्र.क्र.४८/भाषा - ३, दि. ०६ जून, २०२५ व मराठी भाषा विभागाचे पत्र क्र. रासांधो २०२३/प्र.क्र.४८/भाषा - ३, दि. १६ जून,२०२५ अन्वये जिल्हा साहित्य संमेलन अनुदान योजना राबविण्यात येते. या योजनेत महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण २०२४ नुसार महाराष्ट्रातील ३६ जिल्हयातील, जिल्हा साहित्य संमेलनास दरवर्षी प्रत्येकी रक्कम रू. ५.०० लक्ष याप्रमाणे अनुदान दिले जाते.

**१०) बृहद्ग्रंथ प्रकल्प योजना** -

मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. सासंमं २०१६/प्र.क्र.६०/२०१६/भाषा-३, दि. १३/०५/२०१६ अन्वये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्यावतीने 'बृहद्ग्रंथ प्रकल्प' योजना राबविण्यात येते. महाराष्ट्राचे साहित्य, संस्कृती आणि इतिहास यासारख्या विषयांवर मराठीमध्ये ग्रंथ निर्मिती करणे हे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या मुख्य उद्दिष्टानुसारच सदर योजनेअंतर्गत साहित्य, संस्कृती, कला, इतिहास यासारख्या विषयांवर वैचारिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक, वाङ्मयीन संशोधन या विषयांवरील वैविध्यपूर्ण, महत्त्वपूर्ण, नाविन्यपूर्ण व दुर्मिळ स्वरुपाचे बृहद्ग्रंथ प्रकल्प हाती घेण्यात येऊन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून प्रकाशित केले जातात.